# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICTION / 67 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–12092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

संदर्भ :–१) OW/DCP TRAFFIC THN/ADM/PATRI PUL CLOGE/ NOTIFICTION / 39 /2018 Date 17/8/2018
२) पोनि कोळसेवाडी वा.उपविभाग यांचे कडील जा.क्र.३५९/२०१८ दि.०८/०९/२०१८

**–:<u>वाहतूक नियंत्रण अधिसुचना</u>:–**

**ज्याअर्थी,** कल्याण (पुर्व) कोळसेवाडी वा. उपविभागाचे हद्दीतील रेल्वे लाईनवरील जुना पत्रीपुल वाहतूकीचे दृष्टीने धोकादायक झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव सर्व प्रकारच्या वाहनांचे ( पदचारीसह ) वाहतूकीस उक्त संदर्भीय वाहतूक नियंत्रण अधिसुचने नुसार बंद करण्यात आला आहे.

**ज्याअर्थी**, नवी मुंबई तळोजा कडून खोणी मार्गे तसेच कल्याण– शिळ रोडने जड अवजड वाहनांची कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीतून एकमेव नवीन पत्रीपुलावरून मोठया प्रमाणात वाहतूक होते. परंतू नवीन पत्रीपुल वाहनांचे दुतर्फा वाहतूकीस अपुरा पडत असल्याने वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडीची समस्या होत असते.

**ज्याअर्थी**, कल्याण ( पुर्व )कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीतील गणेश मुर्ती विसर्जनाच्या मिरवणूका कल्याण पश्चिम येथील दुर्गाडी गणेश घाटावर जात असल्याने गणेश मुर्ती विर्सजनाचे दिवशी सदर मार्गावरील वाहतूक सुरळीत व सुरक्षीत होण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी** मी, अमित का. काळे, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग ,ठाणे शहर, महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

१) कल्याण (पुर्व) कडून कल्याण –शिळ रोडने कल्याण (पश्चिम) दिशेने नवीन पत्रीपुलावरून जाणाऱ्या वाहनांचे वाहतूकीस <u>बदलापुर चौकात प्रवेश बंद</u> करण्यात येत आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>** :– सदरची वाहने बदलापुर चौकातून अंबरनाथ–बदलापुर पाईपलाईन रोडने इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसचुना ही गणेश मुर्ती विसर्जनाच्या दिवशी म्हणजे दि. १७/०९/२०१८ रोजी ( पाच दिवसाचे) ,दि. १९/०९/२०१८ रोजी (गौरी गणपती –सात दिवसाचे), व दि.२३/०९/२०१८ रोजी –(अनंत चतुर्दशी) दुपारी १४.०० ते गणेश मुर्ती विसर्जन संपेपर्यंत अंमलात राहिल.

सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मुर्ती विसर्जनाच्या वाहनांना लागू राहणार नाही.

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**

मा.आयुक्त, कल्याण–डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.

मा.जिल्हाधिकारी,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–३,कल्याण, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा,ठाणे

प्रतः– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ कल्याण ,उल्हासनगर वाहतूक विभाग/प्रभारी अधिकारी,_कल्याण/कोळसेवाडी/उल्हासनगर वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.